**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित,कोल्हापूर**
**मुख्य कार्यालय, कोल्हापूर**

==================================================

जा.क्र.७६९ / २०१६-१७ **परिपत्रक** दिनांक २८ / १२ /२०१६

प्रति,
शाखाप्रमुखसो

----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------

**विषय - सभासद कल्याण ठेव योजना व व्याजदर बदलाबाबत.. .. ..**

**महोदय,**

सन्माननीय शाखाप्रमुख,सभासद बंधू भगीनींना न्रम निवेदन

**१ ) संचालक मंडळ सभा क्र.११ दिनांक १७/१२/२०१६ चे ठराव क्र.११ (५) नुसार कर्ज व्याजदर व ठेव व्याजदराबाबत निर्णय घेणेत येऊन दिनांक ०१/०१/२०१७ पासून कर्ज व्याजदर ०.५०% कपात करुन १२.५०% करणेत आला आहे.ठेवीचे व्याजदरामध्येही ०.५०% कपात करणेत आली असून ठेवीचे व्याजदर दि.०१/०१/२०१७ पासून पुढील बदललेल्या दराप्रमाणे राहातील.**

**ठेवीचे व्याज दर**

| मुदत बंद ठेव | दामदुप्पट ठेव | रिकरींग ठेव योजना |
|---|---|---|
| ३ महिने ते ६ महिने पर्यंत ८.०० % | सौ.सुशिलादेवी साळुंखे ठेव योजना १०.०० % कालावधी ९६ महिने | १२ महिने ९.०० % |
| ७ महिने ते १२ महिने पर्यंत ९.०० %<br>१३ महिने ते २४ महिने पर्यंत १०.०० %<br>२५ महिने पुढील ९.०० % | डॉ.बापूजी साळुंखे जेष्ठ नागरीक ठेव योजना ११.०० % कालावधी ८४ महिने (६५ वर्षावरील ठेवीदारांसाठी वयाचा दाखला आवश्यक) | २४ महिने १०.०० %<br>३६ महिने व त्यावरील मुदतीकरीता ९.०० % |

| शुभमंगल ठेव योजना | | | | लखपती ठेव योजना | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ठेव रुपये | मुदत | मिळणारी रक्कम | व्याज दर | ठेव रुपये | मुदत | मिळणारी रक्कम | व्याज दर |
| १०००/- | २४ वर्षे ६ महिने | १०,०००/- | १०% | १०००/- | ४८ वर्ष | १०००००/- | १०% |
| २०००/- | १७ वर्षे | १०,०००/- | १०% | २०००/- | ४१ वर्ष | १०००००/- | १०% |
| | | | | ५०००/- | ३१ वर्ष ६ महिने | १०००००/- | १०% |
| | | | | १००००/- | २४ वर्ष ६ महिने | १०००००/- | १०% |
| | | | | २५०००/- | १५ वर्ष | १०००००/- | १०% |

कर्ज व्याजदर - सर्व साधेकर्ज,तातडीचे कर्ज,हायरपर्चेस कर्जासाठी **१२.५०% ( बदललेला व्याजदर यापुर्वीच्या कर्जांना दि.०१/०१/२०१७ पासून लागु राहील.)**

२) प्रत्येक महिन्याचे पहिल्या शनिवारी कर्ज उपसमिती सभा व तिस-या शनिवारी संचालक सभा घेतली जाईल.साप्ताहीक रविवार सुटटीबरोबर दुसरा व चौथा शनिवार कार्यालय बंद राहील.

३) वार्षिक सर्वसाधारण सभा क्र.३८ व ३९ नुसार व मा.सहकार आयुक्त व निबंधकसो सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे मंजूरी पत्रानुसार संस्थेने दि.०१/०१/२०१७ पासून सभासद कल्याण ठेव योजना सुरु करणेचे ठरवले आहे.सदर योजनेत संस्थेचे सर्व सभासदांनी सहभाग घ्यावा व त्यापासून होणारे संभाव्य फायद्याचा विचार करुन सदरची योजना सर्व सभासदांचे कल्याणासाठी उपयुक्त असल्याने त्यामध्ये सर्वानी सहभागी होऊन सहकार्य करावे.या योजनेमध्ये भाग घेणेसाठी सोबत अर्जाचा नमुना दिला आहे.त्यानुसार संस्थेकडे आपला अर्ज सादर करावा.याबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास शाखा कार्यालय किंवा मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.( योजना तपशील सोबत जोडला आहे.)

४) संस्थेचे सर्व सभासदांची वर्गणी मागणी ही दि.२७/११/२०१५ चे सहकार आयुक्त व निबंधकसो सहकारी संस्था पुणे यांचे मंजूरी पत्रानुसार केली जात असुन त्यानुसार काही शाखा आपली कपात करत नाहीत.ज्या शाखामधुन अशी मागणी केलेली वाढीव वर्गणी कपात केली जात नाही अशा शाखाप्रमुखांनी पत संस्थेस दिलेल्या हमीपत्राचा विचार करुन सदरची मागणी रक्कम कपात करावी.

५) संस्थेचे KYC नॉर्मप्रमाणे प्रत्येक सभासदांचेकडून आधार कार्ड व पॅन कार्ड सेल्फ अटेस्टेड करुन संस्थेकडे सादर करणे आवश्यक आहे.तरी सर्व सभासदांनी याबाबत दक्षता घेऊन संस्थेकडे वेळेत सदरची पुर्तता करावी.

६) संस्थेचे सर्व सभासदांना व ठेवीदारानां संस्थेकडून मिळणारा लाभांश व ठेव व्याज करपात्र असून त्यानुसार सभासद व ठेवीदार

७) सभासदांनी केलेल्या व्यवहाराची माहिती त्यांना तात्काळ व्हावी यासाठी SMS सुविध उपलब्ध केली आहे.त्यामुळे सभासदांना त्यांचे व्यवहाराची माहिती मिळते.यासाठी ज्या सभासदांनी आपले मोबाईल नंबर अद्याप दिलेले नाहीत त्यांनी त्यांची नोंद संस्थेकडे करुन SMS सोईचा लाभ घ्यावा.

८) संस्थेकडून सभासदांनी घेतलेल्या कर्ज रक्कमेस कर्जदार सभासदाइतकाच जामिनदार सभासद जबाबदार असतो.त्यामुळे कर्ज थकबाकीत जाणार नाही याची काळजी कर्जदारांनी घेणे आवश्यक आहे.तसेच आपण जामिन राहीलेला कर्जदार वेळेत हप्ते जमा करतो किंवा नाही याची माहिती जामीनदारांनाही घेणे आवश्यक असून त्याबाबत दक्ष राहाणे आवश्यक आहे.

९) सर्व शाखाप्रुखांनी मासीक कपात केलेल्या वसुलीची यादी वेतन बील सादर करणेचे दिनांका दिवशीच पतसंस्थेकडे पाठवावी.यामुळे यादी पतसंस्थेकडे अगोदर प्राप्त झालेने बँक खातेवर जमा होणारा वसुल वेळेत जमा घेता येईल व त्यामुळे होणारे व्याजाचा भुर्दंड सभासदांना सहन करावा लागणार नाही.ब-याच शाखामधुन वसुली रक्कम व यादी वेळेत न पाठवल्याने व्याजाचा भूर्दंड सभासदांना सहन करावा लागत आहे.त्यामुळे याबाबत दक्षता न घेतलेस संबंधीत विलंबीत रक्कमेच्या व्याजाची जबाबदारी ही शाखाप्रमुख यांचेवर राहील, याची नोंद घ्यावी.

१०) सर्व शाखाप्रमुखांनी सेवानिवृत्त सभासदांचे प्रस्ताव स्विकारतांना पतसंस्थेचे ना देय प्रमाणपत्र घेतले शिवाय त्यांचे कागदपत्रावर शिफारस करु नये.हमी दिलेले सभासदांचे सेवानिवृत्तीची कागदपत्राची पुर्तता ना-देय प्रमाणपत्राशिवय केल्यास व त्यामुळे थकबाकी राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी शाखाप्रमुख यांची राहील.

११) आपल्या शाखेत जे सेवक शिक्षण संस्थेचे कायम सेवक आहेत व पतसंस्थेचे सभासद नाहीत,अशा सेवकांनी पतसंस्थेकडे सभासदत्व स्विकारणेसाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दि.१७/१०/२०१५ रोजीचे पत्रानुसार सभासदत्व स्विकारावे यासाठी प्रयत्न करावा.

१२) सभासदांनी व सेवानिवृत सभासदांनी अ.नं. १ मध्ये नमुद केलेल्या व्याजदरानुसार पतसंस्थेकडे ठेवी स्विकारल्या जात असल्याने सर्वांनी पतसंस्थेकडे ठेव रक्कम जमा करुन मिळणारे व्याजाचा लाभ घ्यावा व पतसंस्थेच्या व्यवहारात सहभाग घ्यावा.

१३) ९७ घटना दुरुस्ती नुसार जे सभासद संस्थेकडे किमान ठरवून दिलेले रक्कमेचा व्यवहार करणार नाहीत असे सभासद अक्रियाशील सभासद असलेचे मानले जाईल त्यामुळे त्यांचे हक्कावर निबंध येऊ शकतात व ते अपात्र होऊ शकतात यासाठी पाच वर्षामध्ये १ वर्षासाठी दहा हजार रक्कमेचा व्यवहार व पाच वर्षातुन एक वर्षासाठी साधारण सभा उपस्थिती आवश्यक आहे.त्याच प्रमाणे संस्थेचे सभासद प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये भाग घेणे आवश्यक आहे.

१४) आपली संस्था १९९८-९९ पासून कॅशलेस व्यवहाराचा अबलंब करीत आहे.त्यामूळे सर्व सभासदांनी संस्थेशी केले जाणारे व्यवहार हे प्रामुख्याने चेक,डी.डी.NEFT , RTGS या मार्गाचा अबलंब करुनच करावेत.रोखीचा व्यवहार करणे पतसंस्थेस अपेक्षीत नाही.

सहकार्याबद्दल आभारी आहे.

| | | |
|---|---|---|
| श्री.वेटाळे एस.आर. | श्री.शेंडगे एस.डी. | श्री.गलांडे यू.एस. |
| सेक्रेटरी | व्हा.चेअरमन | चेअरमन |

**टिप - (कृपया सदरचे परिपत्रक संस्थेच्या सर्व सभासदांच्या निदर्शनास आणावे)**

**अधिक माहितीसाठी पतसंस्थेच्या www.vivekanandkop.com या संकेत स्थळावर भेट दया.**